अतितात्काळ / कालमर्यादा

क्र. पोमसं/९(NGO)/पीपीएम-पीएम/१-२०२७/१८६/२०२२ मुंबई, दि. ३०/१०/२०२६

संदर्भ :- या कार्यालयाचे समक्रमांक, दि. ०४/०९/२०२६ चे परिपत्रक.

विषय :- सन २०२७ च्या प्रजासत्ताक दिनानिमित्त (दि. २६/०१/२०२७) प्रदान करण्यात येणाऱ्या राष्ट्रपतींचे उल्लेखनीय सेवेचे पदक (PSM) व गुणवत्तापूर्ण सेवेचे पदक (MSM) यांसाठी सुधारित निकषांनुसार शिफारशी सादर करण्याबाबत.

******

परिपत्रक :-

केंद्र शासनामार्फत दि. २६/०१/२०२७ रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त घोषित करण्यात येणाऱ्या राष्ट्रपतींचे उल्लेखनीय सेवेचे पदक (PSM) व गुणवत्तापूर्ण सेवेचे पदक (MSM) यांसाठी या कार्यालयाच्या संदर्भाधीन परिपत्रकान्वये पोर्टलद्वारे शिफारशी मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार विविध पोलीस घटकांकडून प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत.

तथापि, केंद्रीय गृह मंत्रालयाने पदकांच्या शिफारशींसाठी सुधारित कार्यपद्धती (New SOP/Guidelines) अमलात आणली आहे. त्यामुळे पूर्वी प्राप्त झालेल्या प्रस्तावांची पुनर्रचना करून सुधारित नमुन्यात व अटींनुसार पुन: प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. सर्व संबंधित घटक प्रमुखांनी खालील सुधारित अटी, शर्ती व सूचनांचे काटेकोरपणे पालन करून यापूर्वीच सादर केलेल्या पात्र अधिकारी व अंमलदारांच्या शिफारशी सुधारित निकषानुसार पुन्हा विहीत नमुन्यात सादर कराव्यात:

१. पदकांसाठी पात्रतेचे सुधारीत निकष :-

(अ) मा. राष्ट्रपतींचे उल्लेखनीय सेवेचे पदक (PSM) :-

सेवेची अट - सदर पदकासाठी संबंधित अधिकारी अथवा अंमलदार यांची दिनांक २६/१/२०२७ रोजी किमान २५ वर्षांची सेवा पूर्ण असणे आवश्यक आहे. तसेच संबंधित अधिकारी अथवा अंमलदारास यापूर्वी गुणवत्तापूर्ण सेवेचे पदक (MSM) प्राप्त झाले असल्यास, सदर पदक प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून किमान ६ वर्षांचा कालावधी पूर्ण झालेला असणे बंधनकारक आहे.

गोपनीय अहवाल - मागील १० वर्षांच्या वार्षिक कार्यमूल्यमापन अहवालांपैकी किमान ६ वर्षांचे अहवाल अत्युत्कृष्ट *(Outstanding)* या प्रतवारीचे असावेत व उर्वरित अहवाल *अतिशय चांगले (Very Good)* या प्रतवारीचे असावेत. *Very Good* पेक्षा कमी असलेली प्रतवारी विचारात घेण्यात येऊ नयेत.

(ब) गुणवत्तापूर्ण सेवेचे पदक (MSM) :-

सेवेची अट - सदर पदकासाठी संबंधित अधिकारी अथवा अंमलदार यांची दिनांक २६/१/२०२७ रोजी किमान १८ वर्षांची सेवा पूर्ण असणे आवश्यक आहे.

गोपनीय अहवाल - मागील १० वर्षांच्या वार्षिक कार्यमूल्यमापन अहवालांपैकी किमान ३ वर्षांचे अहवाल अत्युत्कृष्ट *(Outstanding)* या प्रतवारीचे असावेत व उर्वरित अहवाल *अतिशय चांगले (Very Good)* या प्रतवारीचे असावेत. *Very Good* पेक्षा कमी असलेली प्रतवारी विचारात घेण्यात येऊ नयेत.

२. वार्षिक कार्यमूल्यमापन अहवालाबाबतचे स्पष्टीकरण :-

१. एकापेक्षा अधिक वर्षांचे वार्षिक कार्यमूल्यमापन अहवाल उपलब्ध नसल्यास संबंधित अधिकारी अथवा अंमलदाराचा प्रस्ताव पदकासाठी अपात्र समजण्यात येईल. असे अपात्र प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर करण्यात येऊ नयेत. याबाबतचे सविस्तर स्पष्टीकरण खालीलप्रमाणे आहे:

अ) गहाळ अहवाल (Missing APAR): संबंधित अधिकारी किंवा अंमलदाराने स्वतःचा स्व-मूल्यांकन अहवाल भरला नसल्यामुळे किंवा कार्यमूल्यमापन अहवाल पूर्ण न होण्यास संबंधित अधिकारी/अंमलदार स्वतः जबाबदार असल्याचे निदर्शनास आल्यास, सदर अहवाल Missing APAR समजण्यात येईल. अशा प्रकरणी प्रस्तावाची शिफारस केली जाऊ नये.

ब) ग्राह्य धरण्यात येणारे प्रमाणपत्र (NIC/CERT): संबंधित अधिकारी/अंमलदार वैद्यकीय रजेवर किंवा इतर कारणास्वत अथवा प्रतिवेदन (Reporting) किंवा पुनर्विलोकन (Reviewing) अधिकाऱ्यांनी संबंधित गोपनीय अहवाल न लिहिल्यामुळे अहवाल उपलब्ध नसल्यास, त्या कालावधीसाठी दिलेले प्रमाणपत्र (Certificate / NIC) ग्राह्य धरण्यात येईल. असे NIC/CERT दिले असल्यास, दोन्ही पदकांसाठी त्यापूर्वीच्या जास्तीत जास्त ३ वर्षांतील वार्षिक कार्यमूल्यमापन अहवाल विचारात घेण्यात यावेत.

२. वार्षिक गोपनीय अहवालाची प्रतवारी सादर करताना शेवटच्या सलग तीन (३) वर्षांचा गोपनीय अहवाल उपलब्ध असणे बंधनकारक आहे. शेवटच्या ३ वर्षांपैकी कोणत्याही एका वर्षाचा कार्यमूल्यमापन अहवाल लिहिला गेला नसल्यास किंवा NIC उपलब्ध नसल्यास, अशा अधिकारी अथवा अंमलदाराचा प्रस्ताव या कार्यालयास सादर करण्यात येऊ नये.

३. सचोटी, चारित्र्य व शिस्तभंगविषयक पडताळणी :-

i) पदकासाठी शिफारस करण्यात येणाऱ्या संबंधित अधिकारी अथवा अंमलदाराची सचोटी निर्विवाद व संशयातीत (Beyond doubt) असणे आवश्यक आहे.

ii) संबंधित अधिकारी अथवा अंमलदाराविरुद्ध न्यायालयाने दखल घेतलेल्या प्रकरणातील कार्यवाही, न्यायालयीन अथवा विभागीय प्रकरणे तसेच दक्षताविषयक प्रकरणे प्रलंबित किंवा विचाराधीन नसावीत.

iii) तसेच, मागील १० वर्षांच्या आढावा कालावधीत संबंधित अधिकारी अथवा अंमलदारास कोणतीही मोठी किंवा किरकोळ शिक्षा (ठपका / सक्त ताकिद अथवा दंड) झालेला नसावा. **किरकोळ शिक्षा अथवा समज यासंदर्भात संपूर्ण सेवाकालावधी ऐवजी मागील (१०+३ वर्षे) आढावा घेण्यात यावा.**

४. वैद्यकीय पात्रतेसंबंधी निकष :-

i) पदकासाठी शिफारस करण्यात येणाऱ्या संबंधित अधिकारी अथवा अंमलदाराची वैद्यकीय श्रेणी *SHAPE-१* असणे आवश्यक आहे. तथापि, कर्तव्य बजावताना युद्धभूमीवर झालेल्या दुखापती, अवयव गमावणे, कार्यवाहीदरम्यान झालेल्या दुखापती अथवा अपघातामुळे *SHAPE-३* किंवा *कमी वैद्यकीय श्रेणी (Low Medical Category - LMC)* प्राप्त झालेल्या अधिकारी अथवा अंमलदारांना कार्यपद्धतीमध्ये नमूद केलेल्या विशिष्ट परिस्थितीत पदकाच्या पात्रतेसाठी *Deemed SHAPE-१* समजण्यात येईल. यासंदर्भात अधिकृत वैद्यकीय अधिकारी अथवा वैद्यकीय मंडळाचे प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असून, दि. २८/०९/२०१७ रोजीच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यात यावे.

५. **या कार्यालयास सादर करण्यात आलेल्या प्रस्तावामधील जे पोलीस अधिकारी / कर्मचारी हे माजी सैनिक असतील त्यांचे नावासमोर माजी सैनिक (Ex-Serviceman) असे स्पष्ट नमूद करावे व त्यानुसार त्यांची सैनिक म्हणून भरती झालेली तारीख नमूद करावी.**

६. **अवतरण (Citation) :-**

पदकासाठी निर्धारित केलेल्या मूलभूत पात्रता निकषांची पूर्तता करण्याबरोबरच संबंधित अधिकारी अथवा अंमलदाराने केलेल्या विशेष व उल्लेखनीय कामगिरीचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करण्यात यावे.

यामध्ये प्रामुख्याने कठीण व दुर्गम क्षेत्रातील कर्तव्यपालन, संकट व्यवस्थापन, कायदा व सुव्यवस्था राखणे, विशेष जोखमीच्या नियुक्त्या, गुन्हे अन्वेषण व माहिती संकलन, प्रशिक्षण, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर व नावीन्यपूर्ण उपक्रम, कारागृह व सुधार सेवा, सीमापार समन्वय, आपत्कालीन प्रतिसाद तसेच प्रशासकीय व तांत्रिक क्षेत्रांतील विशेष योगदान यांचा विचार करण्यात यावा.

अवतरणामध्ये (Citation) *"उत्कृष्ट काम केले" ("did excellent work")* किंवा *"खूप प्रामाणिक आहेत" ("is very honest")* अशा स्वरूपाचे सर्वसाधारण, अस्पष्ट किंवा गुघळी निर्माण करणारे नेहमीचे शब्दप्रयोग वापरू नयेत.

अवतरण हे अगदी **अचूक (precise), सत्यापित करता येण्याजोगे / पडताळणीयोग्य (verifiable)** आणि **योग्य रचनेचे (well structured)** असावे. त्यामध्ये खालील नमूद निकषांमध्ये केलेल्या व्यावसायिक कामगिरी व विशेष योगदानाचा स्पष्टपणे उल्लेख असावा.

पदकासाठी शिफारस करण्यात येणाऱ्या अधिकारी अथवा अंमलदाराच्या विशेष व उल्लेखनीय कामगिरीचे अवतरण (Citation) इंग्रजी भाषेत, व्याकरणदृष्ट्या शुद्ध, वस्तुनिष्ठ व कमाल २०० शब्दांमध्ये घटक प्रमुखांने स्वत: पडताळून सादर करावे.

(a) आव्हानात्मक क्षेत्रातील नियुक्त्या (Difficult field postings): कठीण भौगोलिक प्रदेश, राष्ट्रीय सुरक्षेच्या संवेदनशील क्षेत्रांत किंवा अधिक उंचीवरील सीमाचौक्यांवर दीर्घ नियुक्त्यांदरम्यान कार्यक्षमतेचे, सज्जतेचे आणि पथकाच्या मनोबलाचे उच्च निकष राखणे.

(b) संकटे व अशांतता हाताळणे (Handling crises and unrest) : नागरी अशांतता नियंत्रित करणे, सामूहिक पलायन रोखणे किंवा सार्वजनिक सुव्यवस्था बिघडण्याच्या घटना योग्य निर्णयक्षमतेने आणि किमान व प्रमाणबद्ध बळाचा वापर करून हाताळणे; तसेच मोठ्या आपत्कालीन परिस्थिती किंवा नैसर्गिक आपत्तींमध्ये अत्यावश्यक सेवा व सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित राखणे.

(c) विशेष किंवा जोखमीची कामे (Special or risky assignments): नियमित कर्तव्याच्या पलीकडे जाऊन धोकादायक, अस्थिर किंवा गुंतागुंतीची कामे सातत्याने आणि दस्तऐवजीकरणासह पार पाडणे.

(d) तपास (न्यायालयीन व वैज्ञानिक) (Investigation judicial and scientific): पुराव्यांचे काळजीपूर्वक संकलन, अभियोजनाशी निकट समन्वय आणि न्यायवैद्यक, डिजिटल मागोवा किंवा सायबर विश्लेषणाचा वापर करून दोषसिद्धीचे उच्च प्रमाण प्राप्त करणे किंवा गुंतागुंतीची, गंभीर अथवा अज्ञात आरोपीची प्रकरणे उकलणे.

(e) अटकाव व जप्ती (Interception and recovery) : सक्रिय क्षेत्रीय गस्त, उपयोगी गुप्तवार्ता आणि तांत्रिक देखरेखीच्या साहाय्याने अवैध वस्तू, तस्करीचा माल किंवा चोरीची मालमत्ता सातत्याने हस्तगत करणे.

(f) गुन्हेगारी जाळे उद्ध्वस्त करणे (Busting of criminal networks) : संघटित गुन्हेगारी टोळ्या, दहशतवादी गट किंवा डाव्या विचारसरणीच्या अतिरेकी (LWE) जाळ्यांचे यशस्वी उच्चाटन करणाऱ्या उच्चस्तरीय गुप्तवार्ता मोहिमांचे नियोजन व अंमलबजावणी करणे.

(g) कारागृह प्रशासन व सुरक्षा (Prison administration and security) : कारागृहांत प्रभावी नेतृत्व, कडक सुरक्षा, प्रतिबंधित वस्तूंचा प्रवेश रोखणे, उच्च जोखमीच्या कैद्यांचे व्यवस्थापन तसेच पुनर्वसन, व्यावसायिक प्रशिक्षण व सुधारात्मक कार्यक्रम यशस्वीपणे राबविणे.

(h) तळागाळातील गुप्तवार्ता व बीट पोलीसिंग (Grassroots intelligence and beat policing) : परिणामकारक प्रतिबंधात्मक अटक, फरार व्यक्तींचा शोध किंवा स्थानिक अवैध टोळ्यांचे उच्चाटन यांसाठी स्थानिक माहितीदारांचे सक्षम जाळे विकसित करणे.

(i) आपत्कालीन परिस्थितीत प्रथम प्रतिसाद (First response in emergencies) : विशेष पथके येण्यापूर्वी आपत्कालीन प्रतिसाद, अपघातातील बचावकार्य किंवा तात्काळ आपत्ती प्रतिसादाच्या वेळी प्राणरक्षक कृती करणे.

(j) प्रशासकीय, तांत्रिक, शैक्षणिक किंवा विशेष क्षेत्रातील उत्कृष्टता (Administrative, technical, educational or specialized excellence) : प्रशिक्षण, माहिती तंत्रज्ञान/दळणवळण, मंत्रालयीन प्रशासन, न्यायवैद्यक/कायदेशीर सहाय्य, वाहतूक व्यवस्थापन, महिला व बालसुरक्षा किंवा पूरक सेवांमध्ये तुल्यबळ गुणवत्तेचे इतर कोणतेही उल्लेखनीय योगदान.

७. प्रस्ताव सादर केल्यानंतर प्रतिकूल माहिती प्राप्त झाल्यास करावयाची कार्यवाही :- पदकासाठी शिफारस सादर केल्यानंतर संबंधित अधिकारी अथवा अंमलदाराविरुद्ध कोणतीही प्रतिकूल माहिती निदर्शनास आल्यास, सदर बाब या कार्यालयाच्या निदर्शनास तात्काळ आणून देण्यात यावी.

८. प्रस्ताव सादर करण्याची कार्यपद्धती :-

पोलीस उप अधीक्षक ते पोलीस शिपाई या पदांवरील अधिकारी व अंमलदारांचे प्रस्ताव संबंधित पोलीस महासंचालक, अपर पोलीस महासंचालक, पोलीस आयुक्त, परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक अथवा पोलीस उप महानिरीक्षक यांच्यामार्फत https://dgphq.in/medal_master/login.php या पोर्टलवर सादर करण्यात यावेत.

सर्व संबंधित अधिका-यांना विनंती करण्यात येते की, सुधारीत केलेल्या विहीत नमुन्यामध्ये **सुधारीत प्रस्ताव या कार्यालयास नमूद पोर्टलद्वारे दि. ०६/११/२०२६ पर्यंत न चुकता** सादर करावेत.

(सुप्रिया पाटील-यादव)
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)
पोलीस महासंचालक यांचेकरीता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म. राज्य, मुंबई (सस्नेह सादर).
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह).
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, म.राज्य, पुणे.
संचालक, पोलीस दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व मोटार परिवहन विभाग, म.राज्य, पुणे.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक / वाहतूक / प्रशिक्षण व खास पथके / आर्थिक गुन्हे शाखा / लोहमार्ग / रा.रा.पो.बल / फोर्स वन / सायबर / विशेष कृती / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग व नागरी हक्क संरक्षण, म.राज्य, मुंबई.
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स / मोटार परिवहन पुणे / रा.रा.पो.बल पुणे व नागपूर / नक्षल विरोधी अभियान, नागपूर / सागरी सुरक्षा व विशेष सुरक्षा, म.रा, मुंबई.
संचालक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, वडाची वाडी, पुणे.

सर्व पोलीस अधीक्षक (जिल्हा / रेल्वे / बिनतारी संदेश).
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल.
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
प्राचार्य, अपारंपरिक अभियान प्रशिक्षण केंद्र, नागपूर.

प्रत,

अपर पोलीस महासंचालक, कारागृह व सुधार सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.

२. कारागृह व सुधार सेवा येथे कार्यरत असलेल्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे प्रस्ताव ऑफलाईन पद्धतीने या कार्यालयास पाठवावे.

पोलीस उपअधीक्षक, संगणक कक्ष, पोमसं कार्यालय, म. रा., मुंबई.

२. सदर परिपत्रक पोलीस विभागाच्या संकेतस्थळावर **"Revised Circular for PSM and MSM Medal -26th January 2027"** व **"दि. २६/०१/२०२७ रोजी जाहीर होणाऱ्या मा. राष्ट्रपती यांचे उल्लेखनी व गुणवत्तापूर्ण सेवा पदकाचे सुधारीत परिपत्रक"** या शिर्षाखाली उपलब्ध करून द्यावे.

Application for Medal for Meritorious Service / Distinguished service - 2027

Nomination ID		Name		Photo
Award Category		Field		

Father's Name		DOB	
Age		Gender	
Mother's Name		Spouse Name	
Mobile		Nationality	
Religion		Category	
Caste		Email	
Country		State	
District		Address	
Pincode		Domicile Country	
Domicile State		Domicile District	
Domicile Address		Domicile Pincode	
Posthumous			
Nominated By			

DETAILS OF POSTING

Initial Appointment

Date of Joining		Category (Group)	
Service		Rank	
Cadre		Allotment Year (only for IPS/SPS)	
Present Posting with complete postal address and PIN code	, ,		
Name in Hindi			
Designation in English		Designation in Hindi	
Category (Group)		Service	

Place		**PIN Code**	
Date of Posting		**Whether on Deputation**	
Date of Joining on Deputation		**Enter Employee ID / Force No. / Regiment No.**	

ACR GRADING

APAR Grading

Sr No.	Year	Grading Type
1	2012-13	
2	2013-14	
3	2014-15	
4	2015-16	
5	2016-17	
6	2017-18	
7	2018-19	
8	2019-20	
9	2020-21	
10	2021-22	
11	2022-23	
12	2023-24	
13	2024-25	

Number of Missing APARs		**Whether any of the last 3 APARs missing?**	
If last 3 APARs missing? (Write Year)			

DISCIPLINARY DETAILS

Details of any enquiry pending against the officer	
Disciplinary proceedings pending/contemplated against the recommendee	

Details of disciplinary proceedings pending / contemplated against the recommendee

Sr No.	Year	Nature of Allegation	Present Status

Punishment(s)	**Yes / No**

Details of Punishment(s)

Sr No.	Details of Penalty	Year(s)

Court cases pending against the recommendee	**Yes / No**

Details of court cases pending against the recommendee

Sr No.	Year	Details of Charge	Present Status

Medical Category	**SHAPE 1 / SHAPE 2 / SHAPE 3 / SHAPE 4 / SHAPE 5**

CITATION

Professional Achievements & Categories

Challenging Field Deployment	**Yes / No**
Details for Challenging Field Deployment:	
Tactical De-escalation & Crisis Management	**Yes / No**
Details for Tactical De-escalation & Crisis Management:	
High Risk Proactivity	**Yes / No**
Details for High Risk Proactivity:	
Judicial & Scientific Investigation	**Yes / No**
Details for Judicial & Scientific Investigation:	
Interception & Recovery Operations	**Yes / No**
Details for Interception & Recovery Operations:	
Strategic Network Dismantling	**Yes / No**
Details for Strategic Network Dismantling:	
Correctional Administration & Prison Security	**Yes / No**
Details for Correctional Administration & Prison Security:	
Grassroot Intelligence & Beat Domination	**Yes / No**
Details for Grassroot Intelligence & Beat Domination:	

First Responder Excellence	Yes / No
Details for First Responder Excellence:	
Administrative, Technical, Educational or Specialised Excellence	**Yes / No**
Details for Administrative, Technical, Educational or Specialised Excellence:	
Other	**Yes / No**
Details for Other:	

Brief description of work justifying award of Medal (No posting details), in order of importance

REWARDS

Whether any Cash Rewards received?		Total Amount received	
Whether any Others Rewards received			

Details of Other Rewards

Sr No.	Commendation	Appreciation	Good Service Entries	Any other rewards (Specify)
1				

PREVIOUS AWARDS

National Awards

Sr No.	Award Name	Award Category Name	Awarding Body	Year of Award

Other Awards

Sr No.	Award Name	Awarding Body	Field	Level of Award	Year of Award

Previously awarded Medal for Meritorious Service — Year		Previous Medal Occasion	

DOCUMENT

Sr No.	Enclosures	Availability
1	Forwarding letter of Recommending Authority	

✓ It is certified that:

1. The above officer has not been awarded earlier for the medal for which he/she is being recommended.
2. The integrity of the above officer is above suspicion and he/she was not censured in any proceedings that were censured in a court of law.
3. No judicial or departmental proceedings are being contemplated/pending against him/her. No vigilance case is pending/contemplating against him/her. The officer recommended has not been given any major penalty or punishment in the present review.
4. The character and antecedents of the above officer have been duly verified and nothing adverse reported against him/her.
5. Medical category given as per the medical examination carried out by authorised medical officer/medical board.

Certification confirmation:

Nomination Date **Nominated By**